# ९. झुळूक

**दामोदर कारे (१९०९-१९८५) :** प्रसिद्‌ध कवी. त्यांच्या विविध विषयांवरील काव्यरचना प्रसिद्‌ध आहेत. 'निसर्ग' हा त्यांच्या कवितांचा आवडता विषय आहे. त्यांचा 'नन्दादीप' हा काव्यसंग्रह प्रसिद्‌ध आहे.

आपण वाऱ्याची झुळूक झालो तर कोठे कोठे जाता येईल, काय काय पाहता येईल आणि कोणकोणत्या गमती जमती करता येतील याचे मजेदार वर्णन प्रस्तुत कवितेत कवीने केले आहे.

- **ऐका. वाचा. म्हणा.**

वाटते सानुली मंद झुळूक मी व्हावे
घेईल ओढ मन तिकडे स्वैर झुकावे

कधी बाजारी कधी नदीच्या काठी
राईत कधी वा पडक्या वाड्यापाठी
हळु थबकत जावे कधी कानोसा घेत
कधी रमत गमत वा कधी भरारी थेट

लावून अंगुली कलिकेला हळुवार
ती फुलून बघे तो व्हावे पार पसार
परि जाता जाता सुगंध संगे न्यावा
तो दिशादिशांतुनी फिरता उधळुनी द्यावा

गाण्याची चुकलीमुकली गोड लकेर
झुळझुळ झऱ्याची पसरावी चौफेर
शेतात पाचुच्या, निळ्या नदीवर शांत
खुलवीत मखमली तरंग जावे गात

वेळूच्या कुंजी वाजवुनी अलगूज
कणसांच्या कानी सांगावे हितगूज
शिंपावी डोही फुले बकुळीची सारी
गळुनी जांभळे पिकली भुळभुळ तीरी

दिनभरी राबुनी दमला दिसता कोणी
टवटवी मुखावर आणावी बिलगोनी
स्वच्छंद अशा या करुनी नाना मौजा
घ्यावया विसावा यावे मी तिन्हीसांजा



**शब्दार्थ : ओढ** – आकर्षण. **स्वैर** – मुक्त. **राई** – बाग. **कानोसा घेणे** – चाहूल घेणे. **अंगुली** – बोट. **पसार होणे** – पळून जाणे. **कुंज** – वन. **अलगूज** – बासरी. **हितगूज** – गुजगोष्टी, मनातल्या गोष्टी सांगणे. **राबणे** – कष्ट करणे.



## स्वाध्याय

### प्र. १. आकृत्या पूर्ण करा.

(अ) **सानुल्या झुळकेच्या इच्छा**

↓ ↓ ↓ ↓

(आ) **सानुल्या झुळकेच्या प्रवासाचे स्वरूप**

(इ) **सानुल्या झुळकेची लोकोपयोगी कामे**

↓ ↓ ↓

### प्र. २. योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा

(अ) झुळकेला स्वैर झुकावे वाटते, कारण.....

(१) तिला स्वातंत्र्य हवे असते.
(२) तिला सर्वत्र हिंडायचे असते.
(३) तिचे मन तिकडे ओढ घेते.
(४) तिला लोक आमंत्रण देतात.

(आ) वेळूच्या वनात अलगूज वाजते, कारण.....

(१) झुळूक स्वत:च गाणे गाते.
(२) तिथे गुराखी अलगूज वाजवतो.
(३) तिथे ध्वनिफित लावलेली असते.
(४) झुळकेच्या स्पर्शामुळे वेळूतून अलगूजाचा आवाज निघतो.

### प्र. ३. परिणाम लिहा.

(अ) झुळकेने कलिकेला स्पर्श केला–

(आ) बकुळीच्या फुलांना स्पर्श केला–

### प्र. ४. खालील शब्दसमूहांचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.

(अ) चुकलीमुकली लकेर–

(आ) पाचूचे मखमली शेत–

### प्र. ५. एक ते दोन शब्दांत उत्तरे लिहा.

(अ) झुळकेने भेट दिलेली नैसर्गिक ठिकाणे–

(आ) कवितेतील वर्णनावरून कवीने वर्णन केलेला ऋतू–

(इ) झुळकेचा विश्रांतीचा प्रहर–

## खेळूया शब्दांशी.

(अ) कवितेतील यमक जुळणाऱ्या शब्दांच्या जोड्या शोधून लिहा.

(१) व्हावे- (२) काठी- (३) हळूवार- (४) अलगूज-

(आ) खालील शब्दांना कवितेतील शब्द शोधा.

(१) छोटी- (२) ताजेपणा- (३) बोट- (४) पावा-

(इ) तुमच्या शब्दांत उत्तरे लिहा.

(अ) झुळुकेची परोपकारी वृत्ती.

(आ) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण.

## कल्पक होऊया.

- 'तुम्ही पक्षी आहात', अशी कल्पना करून तुम्हांला स्वच्छंदीपणे कोणकोणत्या गोष्टी करायला आवडतील, ते लिहा.

## चला संवाद लिहूया.

- नदी व झाड या दोघांमधील संवादाची कल्पना करून संवादलेखन करा.





नदी : ..........................................................................

झाड : ..........................................................................

नदी : ..........................................................................

झाड : ..........................................................................

नदी : ..........................................................................

झाड : ..........................................................................

P7EFSD